399/


महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्रमांक : बैठक-१८२२/प्र.क्र. २२४/बैठक/२७एप्रिल/२०२३/१२३८ दिनांक : 30/5/23

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०१/२०२३, १४/०२/२०२३, २८/०२/२०२३ व २८/०३/२०२३ रोजीची क्रमांक **६९वी बैठक बुधवार, दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा.** पुढे चालु ठेवण्यात आली असून, सदरील बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या वतीने डॉ. किशोर शिंदे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही. डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी ईमेलद्वारे अनुपस्थितीबाबत कळविले असल्याने त्यांच्या अनुपस्थितीबाबत नोंद घेण्यात आली व इतर मा. सदस्य यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, डॉ. सुनिल लिलानी, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, डॉ. संदिप काळे, सहयोगी प्राध्यापक, आयुष संचालनालय यांचे प्रतिनिधी व श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, वैद्यकीय/आयुष शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक १:</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील खालील नमूद विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>

| अ. क्र. | बैठक वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १. | २७/०४/२०२३ | दुपारी १२:०० वा | तंत्र शिक्षण | B-Engieneering/B-Tech., B-Archtiecture, B-HMCT, M-Engineering/M-Tech., MBA/MMS, MCA, M-Architecture, DSE (Direct Second Year Engineering), DSP (Direct Second Year Pharmacy) व B - Design, B. Pharmacy, Pharm D, M. Pharmacy व Pharm D (PB) |
| | | दुपारी ०२:३० वा | वैद्यकीय शिक्षण | PGM, PGD, MBBS, BDS, PGO, PGP, MASLP, MSPO व M.Sc. Nursing |
| | | दुपारी ०३:३० वा | उच्च शिक्षण | LLB-३, LLB-५ (Integrated), M.Ed., M.P.Ed., B.Ed., B.Ed./M.Ed. (Integrated), B.P.Ed. व BA/BSc - B.Ed.(Integrated) |

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, २) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) संचालक, उच्च् शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अखत्यारितीतील सादर केलेल्या संबंधित महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय अहवालांचे अवलोकन करण्यात आले व तद्नुषंगाने निर्देश देण्यात आले,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २१/१२/२०२२ व ३०/०१/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१५/तांशि-४, दिनांक २२/०१/२०२० रोजी च्या पत्रान्वये "तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय / शासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक संस्थामधील शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० व त्या पुढील प्रवेशांची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून देण्यात येऊ नये" असे कळविले आहे. सबब याबाबत नोंद घेण्यात आली.

३) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय आरोग्य विज्ञानाच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष

393)

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचे अधिकार देखील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) व महानगरपालिका अखत्यारितीतील महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांना प्राधिकरणाच्या दिनांक २५/११/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(क) नुसार " प्रक्रिया शुल्क " अदा करणे अनुज्ञेय राहील व तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम वर्ष व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत आणि पदवी दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या दिनांक १४/०४/२०२३ व २२/०४/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच या अनुषंगाने १) श्री. महेंन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक् प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई २) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व ३) श्री. सिध्देश नर, परीक्षा समन्वयक (वैद्यकीय / आयुष शिक्षण), राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. उर्वरित अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित उपसमितीने कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

६) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ५) अनिवासी भारतीय (एनआरआय ) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया इ. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी करण्याप्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननीची कार्यवाही करावी.

७) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास व्हिवा कॉलेज ऑफ फार्मसी, विरार या संस्थेतील आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गात (EWS) प्रमाणपत्र विहित वेळेत सादर न केल्याप्रकरणी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०३/२०२३ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे. बैठकीतील निर्देशानुसार संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २९/०३/२०२३ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने कु. आदिती अनिल मोरे यांचा प्रवेश पुनर्स्थापित करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत असून, संचालनालयाच्या अहवालनुसार सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

कु. आदिती मोरे या विद्यार्थीनीस EWS प्रवर्गातून निवड झालेली होती. सदर प्रवेश निश्चिती करताना महाविद्यालयाने आवश्यक EWS प्रमाणपत्र विहित कार्यपध्दतीनुसार त्याची पूर्तता केली नाही. या महाविद्यालयाच्या निष्काळजीपणाबद्दल अधिनियम २०१५ मधील कलम २० अन्वये रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

८) अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण व वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना (१) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ६) अनिवासी भारतीय (एनआरआय) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया वगळून) प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

९) तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण (पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रम वगळून), व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने "प्रपत्र - अ" मधील नमूद विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी समितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि संबंधीत उपसमितीद्वारे सादर होणाऱ्या अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

१०) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

१०) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहे. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

११) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे (प्रपत्र-अ), अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी, तथापि ज्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी १% निवडक पध्दतीने प्राधिकरण स्तरावर तपासणी/छाननी प्रक्रिया पुर्ण झालेली नाही, अशा अभ्यासक्रमांच्या / महाविद्यालयांना संबंधीत उपसमितीद्वारे अहवाल प्राप्त झाल्यानंतर व तद्नुषंगाने प्राधिकरणाच्या अंतिम निर्णयांनतर प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

<u>विषय क्रमांक २:</u> <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सामाईक प्रवेश परीक्षा /केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता प्रक्रिये संदर्भात श्री. भोसले समिती नुसार मानधन देण्याबाबत.</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सामाईक प्रवेश परीक्षा /केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यता प्रक्रिये संदर्भात श्री. भोसले समितीच्या अहवालातील शिफारशी नुसार मानधन अदा करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार दोन्ही विभागांनी कार्यवाही करावी.

<u>विषय क्रमांक ३:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>श्री. साई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, परदरी, औरंगाबाद या संस्थेतील थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबत तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दिनांक ९/१/२०२३ रोजीचे पत्र.</u>

श्री. साई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, परदरी, औरंगाबाद येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास स्थलांतरीत करण्यात आलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील याचिका क्रमांक १४८७२/२०२१ सी.ए. क्रमांक ५५३/२०२१ मधील दिनांक २८/०१/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने तसेच सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद व तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे अनुक्रमे २५/११/२०२२ व ९/०१/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेल्या अहवालास अनुसरुन सदरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास कार्यालयाच्या दिनांक २४/०१/२०२३ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील तक्यामध्ये दर्शविल्यानुसार प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे,-

| अ. क्र. | स्थलांतरीत करण्यात आलेल्या महाविद्यालयांचे नाव | श्री. साई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, परदरी, औरंगाबाद या महाविद्यालयातील १०५ प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी खालील महाविद्यालयात स्थलांतरीत प्रवेशांना मान्यता देण्यात आलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | इंटरनॅशनल सेंटर ऑफ एक्सलेन्स इन इंजिनिअरींग अॅण्ड मॅनेजमेंट, औरंगाबाद | ६८ |
| २. | एव्हरेस्ट एज्युकेशनल सोसायटीचे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन, औरंगाबाद | २६ |
| | एकुण : | ९४ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ख) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष शिक्षण विभगाअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयुष संचालनालय, मुंबई यांनी सादर केलेले दिनांक ३०/०१/२०२३ व २८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले अहवाल.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, ज्या प्रवेश प्रकरणी आयुष संचालनालय, मुंबई यांनी त्रुटी दर्शविली अशा प्रकरणांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) अन्वये त्रुटी असलेल्या प्रवेश प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश होते.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ना मंजुर असलेल्या (प्रलंबित प्रकरणी) प्रवेशांबाबत त्वरीत निपटारा होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुनःश्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३०/०१/२०२३ व २८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुष संचालनालय, मुंबई यांच्या विभागांतर्गत प्रवेशांबाबत अहवाल सादर केलेले आहेत.

सविस्तर चर्चेनंतर, उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३०/०१/२०२३ व २८/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयुष संचालनालय, मुंबई यांच्या विभागांतर्गत प्रवेशांबाबत सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व आयुक्त यांनी सदरील प्रवेश मान्यते करिता शिफारस केलेली आहे, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच ज्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निर्णय घेण्याचे सुचित केलेले आहे व मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाने प्रवेशास मान्यते प्रकरणी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (प्रपत्र-ब)

(ग) गोंदिया होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, गोंदिया येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. चौहान संध्या योगराज यांच्या प्रवेशाबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास गोंदिया होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, गोंदिया येथे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या अहवालानुसार प्रवेशित एकूण ४३ विद्यार्थ्यांपैकी संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक ०६/०७/२०२२ रोजीच्या अहवालानुसार ४२ विद्यार्थ्यांचे प्रवेश तपासणी केली व ४२ विद्यार्थी पात्र असल्याचे नमूद करण्यात आले. मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या १% प्रवेश पडताळणी अहवालानुसार ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी आढळून आल्या. त्यानुसार प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये ४० विद्यार्थ्यांच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण

३९०१

प्रवेशांना मान्यता देण्यात आली व उर्वरित ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी दर्शविण्यात आली. उर्वरित ०१ विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात आला.

संबंधित महाविद्यालयातील प्रवेशित कु. गुंजन या विद्यार्थिनीचा प्रवेश रद्द झालेला आहे. परंतु, प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यता पत्रामध्ये तांत्रिक-नजरचुकीने कु. चौहान संध्या योगराज या विद्यार्थिनीचा प्रवेश रद्द असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार, प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतापत्रामध्ये कु. चौहान संध्या योगराज हि विद्यार्थिनी पात्र असल्याने सदर विद्यार्थिनीचा शेरा "पात्र" व कु. गुंजन ह्या विद्यार्थिनीचा शेरा "प्रवेश रद्द" असे नमूद सुधारित मान्यतापत्र निर्गमित करुन व त्यानुषंगाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना दिनांक १७/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. प्राधिकरणाद्वारे याबाबत नोंद घेण्यात आली.

(घ) <u>शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित विद्यापीठांना प्राधिकरणाच्या दिनांक ११/०४/२०२३, १९/०४/२०२३ व २०/०४/२०२३ रोजी निर्गमित केलेली पत्रे.</u>

प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या दिनांक ११/०४/२०२३, १९/०४/२०२३ व २०/०४/२०२३ रोजींच्या पत्रांची नोंद घेण्यात आली.

(ङ) <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षे दरम्यान उद्भवलेल्या अडचणींबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी याबाबम माहिती दिली व बाधित सर्व उमेदवारांसाठी दि.६ मे, २०२३ रोजी फेर परिक्षा ठेवण्याचे अवगत केले. सदरील परिक्षेचा निकाल संबंधित सेवापुरवठादार यांनी विहित कालावधीमध्ये जाहिर करणे बंधनकारक राहील. तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(च) <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्थामध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करण्याबाबत.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून आयोजित सामाईक प्रवेश परीक्षांसाठी शासकीय महाविद्यालये व शासकीय संस्थामध्ये स्वतंत्र केंद्र सुरु करणेकरिता आवश्यक सुविधा निर्माध करणेसाठी निधीची तरतूद करण्यास प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात सादर करण्यात आलेली मानक कार्यपध्दती (SOP) वर बैठकीत चर्चा करण्यात येऊन (SoP) मध्ये अशा केंद्रांसाठी निधीतून खरेदी करावयाची मालमत्ता प्रवेश नियामक प्राधिकरणाची राहील, केंद्राच्या कामाचा आढावा नियमितपणे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्या समितीने घ्यावा, या केंद्राचा सामाईक प्रवेश परीक्षा (CET) घेण्यासाठी परिक्षा केंद्र तसेच जरुर तर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) प्रक्रिये दरम्यान विद्यार्थी सुविधा केंद्र म्हणुन वापर व्हावा, या बाबींचा अंतर्भाव करावा. त्या प्रमाणे पुढील बैठकीत सुधारीत SOP अवलोकनार्थ सादर करावी. दरम्यानच्या कालावधीत निधी हस्तांतरित करण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४(ट) अन्वये घेतलेल्या निर्णयाचे व तद्नुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सादर केलेल्या दिनांक २७/०४/२०२३ रोजींच्या प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले. या संदर्भात सुधारित मार्गदर्शक तत्वे (SoP) तयार करुन पुढील बैठकीत अवलोकनार्थ सादर करावे, असे निर्देश देण्यात आले.

(छ) <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत होणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या केंद्राना मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य, सचिव, अवर सचिव व परिक्षा समन्वयक हे आवश्यकतेनुसार परिक्षा केंद्राना भेट देतील व याबाबत होणारा संपूर्ण खर्च (प्रवास व दैंनिक भत्ता) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून अदा करण्यत येईल.

(ज) <u>प्रवेश नियामक प्राधिकरणा प्रमाणे इतर राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या प्राधिकरणांना भेट देण्याबाबत.</u>

प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य व सचिव तथा आयुक्त यांनी देशातील विविध राज्यांमध्ये अस्तित्वात असलेली प्रवेश नियामक प्राधिकरणे व सीईटी कक्ष यांना भेट देऊन त्यांच्या दैंनदिन कामकाजाबाबत अंमलात आणलेली नियमावली / कार्यपदध्तीचा आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात येत आहे. या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २(घ) नुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच याकरिता सर्व संबंधितांना प्रवास व दैंनिक भत्ता नियमानुसार प्राधिकरणाकडून अनूज्ञेय राहील.

(झ) <u>ॲड. बाळासाहेब आपटे कॉलेज ऑफ लॉ, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विधी -३ व विधी - ५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.</u>

शैक्षणिक २०१७-१८ मधील विधी ३ वर्ष व विधी ५ वर्ष अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबत ॲड बाळासाहेब आपटे विधी महाविद्यालय, दादर, मुंबई या महाविद्यालयातील विधी-३ व विधी-५ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या तपासणी अहवालानुसार खालील प्रमाणे प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विधी ३ वर्ष | ५९ | पात्र |
| २ | विधी ५ वर्ष | १११ | पात्र |

प्राधिकरणाच्या उक्त निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयाचे प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात यावीत.

(ञ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

तसेच आज रोजी घेण्यात आलेली प्राधिकरणाची क्रमांक ६९वी बैठक बुधवार, दिनांक ३१/०५/२०२३ रोजी ठिक दुपारी १२:३० वा. पुन्हा पुढे घेण्यात येईल.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई, २) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
**अध्यक्ष,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण तथा**
**माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.**

दिनांक : ३० | ५ | २३